November-2021 (11)

१० रु. कोर्ट फी COURT FEE Rs.10 INDIA दस रुपये TEN RUPEES 29 SEP 2020

मिरा-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र...11...मा.अ....
दिनांक:...26/11/2021.........

# जोडपत्र – "अ"

## (नियम ३ पहा)

## केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळविण्याबाबतच्या अर्जाचा नमुना

प्रति,

मा. माहिती अधिकारी सो.
विधी व न्याय विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका.

१. अर्जदाराचे पूर्ण नाव : विजय अरविंद मोरे

२. अर्जदाराचा पूर्ण पत्ता : शॉप नं.३७, राज लाइफस्टाइल, हटकेश, जी.सी.सी क्लब जवळ, मिरारोड पूर्व, जि. ठाणे – ४०११०७

३. आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :

एक) माहितीचा विषय : अनधिकृत मोबाईल टॉवर व अनधिकृत बांधकामाबाबत.

दोन) माहिती ज्याच्याशी संबंधित असेल तो कालावधी : 2016 ते आजरोजीपर्यंत

तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :

(1) अनधिकृत मोबाईल टॉवर व इतर अनधिकृत बांधकामाबाबत आजपर्यंत महानगरपालिके मार्फत केलेले उच्चन्यायालय मुंबई येथे विविध प्रकरणात सादर केलेले शपथपत्राच्या प्रती मिळणेबाबत.

~~(2) जनहित याचिका दाखल केलेले~~

(2) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अतिक्रमणे बाबतीत जनहीत याचिका दाखल केलेले शपथपत्राची माहिती मिळावी.

देण्यात येणाऱ्या माहितीचे सर्व कागदपत्राच्या सांक्षाकित व सत्यप्रती सही शिक्यानिशी द्याव्यात. शासकिय नियमानुसार होणारी फी मी देण्यास तयार आहे.

ठिकाण : भाईंदर
दिनांक : 26/11/2021

अर्जदाराची सही

विजय अरविंद मोरे

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./११/२०२१-२२
दि. ३०/११/२०२१

प्रति,
श्री. विजय अरविंद मोरे
शॉप नं. ३७, लाईफस्टाईल, हटकेश,
जी. सी. सी. क्लब जवळ,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे-४०११०७

**विषय :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्ज.**

**संदर्भ** :- आपला दि. २६/११/२०२१ रोजीचा अर्ज.

**महोदय,**

संदर्भिय माहिती अधिकाराच्या अर्जान्वये आपण सन २०१६ ते आजरोजी पर्यंत मिरा भाईंदर मनपा क्षेत्रातील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे व अनधिकृत मोबाईल टॉवर बाबत आजपर्यंत मनपामार्फत उच्च न्यायालय, मुंबई येथे आजपर्यंत सादर केलेल्या सर्व शपथपत्रांच्या छायांकित प्रती अपेक्षिल्या आहेत.

आपण संदर्भिय अर्जान्वये अपेक्षिलेली माहिती मोठया प्रमाणात (Bulky & voluminous) असल्याने विधी विभागातील सर्व कर्मचारी यांना सदरचे काम करावे लागणार आहे. तसेच सदरची सरसकट माहिती देता येत नाही. तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेविरुद्ध मा. न्यायालयात दाखल झालेल्या दावे/याचिकांची माहिती विधी विभागातील संगणकीय आज्ञाप्रणालीमध्ये दावाधारकाचे नाव, दावा/याचिका क्रमांक, सर्व्हे क्रमांक, गावाचे नाव, विभागाचे नाव, बांधकामाचे स्वरुप यानुसार अद्यावत केलेली असून सदरची माहिती www.mbmcrti.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर संकेतस्थळाचे अवलोकन करून आपणास आवश्यक असलेल्या विशिष्ट याचिकेचा क्रमांक विधी विभागास उपलब्ध करुन दिल्यास त्या याचिकेतील कागदपत्रे आपणास विहित फी चा भरणा केल्यास उपलब्ध करुन दिली जाईल.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास श्री. मारुती गायकवाड, मा. प्रथम अपिलीय अधिकारी, मा. उपायुक्त(मु), तिसरा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

Received
1/12/2021.

सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

RTI Application Reply







प्रति,

श्री. विजय अरविंद मोरे
शॉप नं. ३७, राज लाइफस्टाइल,
लटकेश्वा, जी. सी. सी. क्लब जवळ,
मिराशेड पुर्व, जि. ठाणे - ४०११०७